**विमुक्त जाती भटक्या जमाती या घटकांसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेमध्ये सुधारणा.**

**महाराष्ट्र शासन**
**विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांक : गृनियो-२०१७/प्र.क्र.६०/विजाभज-१**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०८ मार्च, २०१९.

<u>संदर्भ</u> : विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, शासन निर्णय
क्र.गृनियो-२०१७/प्र.क्र.६०/विजाभज-१,
दिनांक २४/१/२०१८ तसेच शासन शुध्दीपत्रक दिनांक ८/१/२०१९.

<u>प्रस्तावना :-</u>

१. विमुक्त जाती भटक्या जमाती या प्रवर्गातील समाजास विकासाच्या मूळ प्रवाहात आणणे, त्यांचे राहणीमान उंचावणे, त्यांचे उत्पन्नाचे स्रोत वाढावे, त्यांना स्थिरता प्राप्त व्हावी म्हणून त्यांना जमीन उपलब्ध करुन तेथे वसाहत उभी करुन देणे व त्याठिकाणी त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण बनविणे आवश्यक असल्यामुळे यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना सुधारित करुन ती राज्यात नव्याने राबविण्याचा निर्णय वाचा येथील शासन निर्णयान्वये घेण्यात आला असून योजना राबविण्यासाठीच्या आवश्यक त्या सूचनाही देण्यात आलेल्या आहेत.

२. सदरहू योजनेतून वैयक्तिक तसेच सामूहिक स्वरुपात विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गाच्या समाजास घरकूलाचा लाभ देण्यात येत आहे. लाभार्थ्यांना घरकूलाचा लाभ देण्यासाठी निधीचे वितरणाबाबत काही तांत्रिक अडचणी येत असल्याची बाब ग्रामविकास विकास विभागांतर्गत स्थापन झालेल्या ग्रामीण गृहनिर्माण कक्षाने शासनाच्या निदर्शनास आणली आहे. त्यामुळे सदरहू योजना प्रभावीपणे राबविणे शक्य व्हावे यासाठी वाचा येथील शासन निर्णयात आवश्यक त्या सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

**शासन शुध्दीपत्रक :-**

१. यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना ही राज्यात फक्त विजाभज प्रवर्गात समाविष्ट होणाऱ्या संवर्गासाठीच राबविण्यात येते ही बाब विचारात घेऊन खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

**“वाचा येथील शासन निर्णयातील परिच्छेद क्र.१ मधील अ.क्र. ३), ४) व ७) खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे”.**

२. सदर योजनेचा निधी रमाई आवास योजनेच्या धर्तीवर सदर योजनेच्या वैयक्तिक लाभार्थ्यांना तसेच सामूहिक योजनेतील वैयक्तिक लाभार्थी यांना राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृह निर्माण कार्यालयामार्फत उपलब्ध करुन देण्यात यावा. योजनेंतर्गत घरकूल बांधकामासाठी आवश्यक निधी, प्रतिलाभार्थी रु.१.२० लक्ष (रुपये एक लक्ष वीस हजार) प्रमाणे राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण यांचेकडे वर्ग करण्यास याद्वारे मंजूरी देण्यात येत आहे. वसाहतीच्या प्रकल्पाचा उर्वरित निधी पूर्वीप्रमाणे खर्च करण्यात येईल.

३. ज्या वैयक्तिक लाभार्थ्यांकडे स्वतःची जागा आहे आणि आजपर्यंत त्याने केंद्र व राज्य शासनाच्या कोणत्याही आवास योजनेचा लाभ घेतला नाही, त्यास सदर योजनेचा लाभ देता येईल. मात्र सामूहीक वसाहतीमध्ये शासन निर्णयाप्रमाणे जमीन शासकीय उपलब्ध नसल्यास खाजगी जमिन खरेदीची मुभा आहे.

**वाचा येथील शासन निर्णयातील परिशिष्ट “अ” मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.**

| | |
|---|---|
| पात्रता निकष | यामधील मुद्दा क्र.१, २, ३ व ४ तसेच ५ खालीलप्रमाणे सुधारण्यात येत आहे.<br>१) ही योजना विजाभज जातीच्या सर्व प्रवर्गासाठी लागू राहतील.<br>२) लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. १.२० लक्ष (रुपये एक लक्ष वसी हजार फक्त) पेक्षा कमी असावे.<br>३) व ४) लाभार्थी बेघर अथवा झोपडी/कच्चेघर/पालामध्ये राहणारा असावा/असावेत. (पुनर्वसित/प्रकल्पग्रस्त गावठाणातील लाभार्थी कुटुंबाना सामूहिक वसाहत योजनेमध्ये घरकुलाचा लाभ देण्यासाठी भुमिहीन असल्याची अट शिथिल करण्यात येत आहे मात्र इतर सामुहिक योजनेमध्ये लाभार्थी यांच्यासाठी भूमिहीनची अट कायम राहणार आहे)<br>५) लाभार्थी कुटुंब भूमिहीन आसावे. (प्रकल्पग्रस्त/पुनर्वसित सोडून) परंतु घर बांधण्यासाठी स्वतःच्या मालकीची जागा असावी. |
| प्राधान्यक्रम | यामधील मुद्दा क्र.२ दारिद्रय रेषेखालील कुटुंब/व्यक्ती ही अट वगळण्यात येत आहे. |
| वसाहतीचा प्रकल्प अहवाल, बांधकाम तसेच पायाभूत सुविधा | सदरहू योजनेंतर्गत घराचे बांधकाम करणे तसेच वसाहतीमध्ये पायाभूत सुविधा उदा. पिण्याचे पाणी, विद्युत पुरवठा, अंतर्गत रस्ते, गटारे, समाजमंदीर इत्यादी सर्व बाबी विचारात घेऊन प्रत्येक वसाहतीचा प्रकल्प आराखडा, नकाशा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून करुन घेण्यात यावे किंवा जिल्हाधिकारी यांनी ठरविलेल्या यंत्रणेमार्फत करुन घेण्यात यावा. सदरहू योजनेंतर्गत घराचे बांधकाम करणे तसेच वसाहतीमध्ये घराचे बांधकाम लाभार्थ्यांमार्फतच करावे. त्यासाठी शासनाने निश्चित केलेल्या अनुदानाची रक्कम जिल्हा ग्रामीण विकास |

| | |
|---|---|
| | यंत्रणेमार्फत राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माणकडे वर्ग करण्यात येईल. राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण यांचेमार्फत सदर निधी सार्वजनिक वित्तीय व्यवस्था प्रणाली (PFMS) मार्फत टप्याटप्प्याने लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यात येईल आणि सामूहिक वसाहतीची इतर सोयीसुविधाची कार्ये जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा किंवा जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीच्या सूचनेप्रमाणे इतर यंत्रणेमार्फत करावीत. |

त्याचप्रमाणे परिशिष्ट “अ” मध्ये खालील बाबी नव्याने समाविष्ट करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| प्रशासकीय निधी | राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयास सदरहू योजनेअंतर्गत घरांच्या बांधकामासाठी वर्ग करण्यात येणाऱ्या रक्कमेतील प्रति घरकूल निधीमधील ४% रक्कम प्रशासकीय खर्चाकरीता देय राहील. |

सदर योजनेच्या इतर अटी शर्ती पूर्वीप्रमाणेच राहतील.

सदर शासन शुध्दीपत्रक ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र ०४/यो-१०, दिनांक २/३/२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१९०३०८२०३८३८५३२२ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=VJNT OBCS SBC Welfare Dept., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2019.03.12 13:21:06 +05'30'

**(भा. र. गावित)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.मंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.राज्यमंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
६) प्रधान सचिव (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग), मंत्रालय, मुंबई.
७) प्रधान सचिव (ग्राम विकास विभाग), बांधकाम भवन, मुंबई.

८) संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे.
९) जिल्हाधिकारी (सर्व)
१०) मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व) जिल्हा परिषद
११) प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग (सर्व)
१२) सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण (सर्व)
१३) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१४) निवडनस्ती (विजाभज-२).